मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ताकराचे बिल मिळाल्याची खात्री करुन कराचा भरणा करावा

## नागरिकांना करसंकलन विभागास संपर्क करण्याचे आवाहन : करसंकलन विभाग एसएमएस, टेलीकॉलिंग यामाध्यमातून कर भरण्याचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये ६ लाखाहून अधिक नोंदणीकृत मालमत्ता आहेत. नोंदणीकृत मालमत्तांना मालमत्ताकराचे बिल वेळेमध्ये पोहोचवण्यासाठी करसंकलन विभागाकडून 'प्रकल्प सिध्दी'उपक्रम राबविण्यात आला. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून शहरातील महिला बचत गटांच्या महिलांना शहरामध्ये मालमत्ताकराचे बिल वाटप करण्यासाठी नेमण्यात आले. प्रकल्प सिध्दी उपक्रमाच्या माध्यमातून करसंकलन विभागाने निर्माण केलेल्या मोबाईल अँप्लिकेशनच्या माध्यमातून मालमत्ताधारकांची माहिती अपडेट करण्यात आली. त्यासोबत, मालमत्तांचे अक्षांश-रेखांश, बिल वाटप केल्याची वेळ, बिल वाटप करतानाचा फोटो आदी माहितीचे संकलन करण्यात आले. चालू आर्थिक वर्षामध्ये एप्रिल महिन्यामध्येच ऑनलाईन स्वरुपामध्ये मालमत्ता कराची बिले उपलब्ध करण्यात आली. त्याबरोबरच, करसंकलन विभागाने नागरिकांना सवलतींचा लाभ मिळावा यासाठी बिलाच्या वितरण प्रक्रियेमध्ये सुधारणा करुन बिल वाटपाची प्रक्रियेमध्ये गतिशीलता निर्माण होण्यासाठी पुढाकार घेतला. चालू आर्थिक वर्षामध्ये ५,३२,९९९ मालमत्तांना प्रकल्प सिध्दी उपक्रमाच्या माध्यमातून बिलांचे वितरण करण्यात आले. बिल वितरित केल्यानंतर ज्या मालमत्तांच्या दारावर बिल अटकविण्यात आले व ज्या मालमत्ताधारकांकडे बिल सुपुर्द करण्यात आले अशा सर्वांचे छायाचित्र सुध्दा अँप्लिकेशनद्वारे संकलित करण्यात आले. त्यामुळे करसंकलन विभागाकडे ज्यांना बिल बजाविण्यात आले आहे अशांची इत्यंभूत माहिती असून ज्या नागरिकांना बिल मिळाले नाही अशा नागरिकांनी आपले बिल ऑनलाईन स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या WWW.PCMCINDIA.GOV.IN या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावे. त्यासोबतच, संबंधित करसंकलन विभागीय कार्यालयामध्ये किंवा सारथी हेल्प लाईन क्रमांक ८८८८००६६६६ या क्रमांकावर संपर्क करुन आपल्या बिल वितरित करण्यात आले आहे का याची खात्री करावी. असे कर आकारणी व कर संकलन विभागाकडून मालमत्ताधारकांना आवाहन करण्यात आले आहे.

सध्या ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही मालमत्ताकराचा भरणा केला नाही अशा नागरिकांना करसंकलन विभाग एसएमएस, टेलीकॉलिंग यामाध्यमातून कर भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. नागरिकांनी लवकरात लवकर कराचा भरणा करुन विभागाकडून करण्यात येणारी कारवाई टाळावी यासाठी नागरिकांना विविध प्रकारे आवाहन करण्यात येत आहे.




> "पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने शहरातील मालमत्ताधारकांपर्यंत वेळेमध्ये बिलांचे वाटप व्हावे यासाठी व बिलावरील माहितीमध्ये सुधारण्यासाठी प्रकल्प सिध्दी उपक्रम राबविला. यामाध्यमातून मालमत्तेच्या माहितीमध्ये दुरुस्त्या करण्यात येऊन ती अद्ययावत करण्यात आली. त्यामुळे आता मालमत्ताधारकांना मालमत्ता कराबाबत एसएमएस द्वारे माहिती पोहोचत आहे. महानगरपालिकेच्या प्रकल्प सिध्दी उपक्रमाने करसंकलन विभागामध्ये विधायक बदल घडवून आणला असून करसंकलनामध्ये त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आलेला आहे. ज्या नागरिकांना अद्याप बिल मिळाले नसेल अशा नागरिकांनी ऑनलाईन स्वरुपात बिल उपलब्ध करुन अथवा करसंकलन विभागामध्ये संपर्क साधून आपले बिल उपलब्ध करुन कराचा भरणा करावा."
>
> **- प्रदीप जाभंळे – पाटील, अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी – चिंचवड महानगरपालिका**

# 31 डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस सज्ज

## शहरात ठिकठिकाणी राहणार मोठा बंदोबस्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाने कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी व्यापक बंदोबस्ताची योजना आखली आहे. पोलिस आयुक्तालयाच्या अधिपत्याखाली विशेष बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. ३१ डिसेंबर रात्रीपासून १ जानेवारी २०२५ पर्यंत पोलिसांचा मोठा फौजफाटा शहरभर तैनात असणार आहे.

नववर्षानिमित्त धार्मिक स्थळे, मंदिरे, मशिदी, मॉल्स, हॉटेल्स, लॉजेस आणि सार्वजनिक ठिकाणी विशेष गस्त घालण्यात येणार आहे. महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी पॉईंट्सवर वाहनांची तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल. रात्रीच्या वेळी मद्यप्राशन करून वाहन चालवणारे, भरधाव वाहन चालवणारे आणि सार्वजनिक ठिकाणी अराजकता माजवणाऱ्यांवर विशेष लक्ष ठेवण्यात येईल..



नववर्ष साजरी करताना मर्यादा ओलांडणाऱ्या ध्वनिप्रदूषणाच्या घटना टाळण्यासाठी पोलिसांनी विशेष खबरदारी घेतली आहे. अशा उल्लंघन करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचा इशारा पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिला आहे..

वाहनांवरून अनधिकृतपणे कर्कश आवाज निर्माण करणारे किंवा ट्रिपल सीट वाहन चालवणाऱ्यांवर तात्काळ दंडात्मक कारवाई होणार आहे. याशिवाय, नववर्ष स्वागताच्या उत्साहात गोंगाट किंवा सार्वजनिक ठिकाणी अनुचित वर्तन करणाऱ्यांवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे.संपूर्ण शहरात पोलिस आयुक्त १, सहायक पोलिस आयुक्त ६, पोलिस निरीक्षक ४६, सहायक निरीक्षक / उपनिरीक्षक १५४, पोलिस अंमलदार १५२०, क्यूआरटी पथक १, एसआरपीएफ पथक ५, स्टायकिंग ८ आणि वॉर्डन ७० यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# मराठी नक्षत्रमहाकाव्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी आमदार शंकर जगताप

## 17 व 18 मे 2025 रोजी पिंपरी- चिंचवड कवितेचा राजधानी मध्ये दिमाखात संपन्न होत आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

नक्षत्राचं देणं काव्यमंच मुख्यालय ,भोसरी ,पुणे 39 च्या वतीने आठवे अखिल भारतीय मराठी नक्षत्र महाकाव्यसंमेलन 17 व 18 मे 2025 रोजी पिंपरी- चिंचवड कवितेचा राजधानी मध्ये दिमाखात संपन्न होत आहे. या

महाकाव्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी काव्य व कलाप्रेमी युवा आमदार शंकरभाऊ जगताप यांची एक मताने निवड करण्यात आली. यावेळी नक्षत्राचं देणं काव्यमंच चे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा राजेंद्र सोनवणे, सुप्रसिद्ध निवेदक व विचारवंत श्रीकांत चौगुले, अभियंता विजय कांबळे,सामाजिक कार्यकर्ते मिलिंद घोगरे यांच्या शुभहस्ते निवडपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी निवड पत्र स्वीकारताना आमदार शंकर भाऊ जगताप म्हणाले की,"हा भव्य सोहळा आपल्या पिंपरीच्या शहरात संपन्न होत आहे. याचा आनंद त्यांनी यावेळी व्यक्त केला. हे महाकाव्यसंमेलन अतिशय देखणे आणि सुंदर करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला. कवींसाठी गेले 25 वर्ष शहरांमध्ये व संपूर्ण महाराष्ट्रात सातत्यपूर्ण काम करणारे अतिशय क्रियाशील संस्था आहे. त्यांनी केलेले या बहुमानाचा मी स्वीकार करून सर्वपरीने सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. अशी त्यांनी ग्वाही दिली."



या दोन दिवसाच्या आठव्या अखिल भारतीय नक्षत्र महाकाव्यसंमेलनात महाराष्ट्रातील सर्व कवी कवयित्रींना व विचारवंतांना विनामूल्य सहभाग असणार आहे. तसेच प्रत्येक सहभागीना काव्य सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. सहभागींना चहा, नाश्ता, भोजन व निवास व्यवस्था विनामूल्य करण्यात आली आहे. तसेच प्रत्येकाला आकर्षक सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या महाकाव्यसंमेलनासाठी महाकाव्यसंमेलन अध्यक्ष म्हणून बोल्ड कवी म.भा. चव्हाण हे उपस्थित राहणार आहे.

# पुणे शहरातील वाहतुकीत बदल; मद्यपींवर करडी नजर

## शहरातील अनेक भागात वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार

**पुणे | प्रतिनिधी**

31 डिसेंबरच्या रात्री आपण सरत्या वर्षाला निरोप देणार आहोत. दरम्यान पुणे शहरासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. शहरातील अनेक भागात वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी सर्वत्र जय्यत तयारी सुरु झाली आहे. हॉटेल, रिसॉर्ट आणि पार्टीसाठी अनेकजण सज्ज झाले आहेत. 31 डिसेंबरच्या रात्री आपण सरत्या वर्षाला निरोप देणार आहोत. दरम्यान पुणे शहरासंदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. शहरातील अनेक भागात वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

सरत्या वर्षाला निरोप देऊन नववर्षाचे स्वागत करण्यासाठी लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता, तसेच फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्त्यावर होणारी गर्दी विचारात घेऊन मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळी पाचनंतर लष्कर आणि डेक्कन जिमखाना भागात वाहतूक बदल करण्यात आले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, नववर्षाचे स्वागत करण्यासाठी लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता, तसेच फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्त्यावर होणारी गर्दी विचारात घेऊन मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळी पाचनंतर लष्कर आणि डेक्कन जिमखाना भागात वाहतूक बदल करण्यात आले आहेत.

वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार,'मध्यरात्री गर्दी ओसरेपर्यंत या परिसरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.'

'मद्यप्राशन करून भरधाव वाहने चालविणारे दुचाकीस्वार, मोटारचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांकडून कारवाई (ड्रंक अँड ड्राइव्ह) करण्यात येणार आहे. मद्यपी वाहनचालकांची तपासणी करण्यासाठी ब्रेथ ॲनलायझर यंत्राचा वापर करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली आहे. मध्यरात्री गर्दी ओसरेपर्यंत या परिसरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी दिली 'मद्यप्राशन करून भरधाव वाहने चालविणारे दुचाकीस्वार, मोटारचालकांविरुद्ध वाहतूक पोलिसांकडून कारवाई (ड्रंक अँड ड्राइव्ह) करण्यात येणार आहे.

### हे रस्ते वाहनांसाठी बंद

» लष्कर भागातील महात्मा गांधी रस्ता परिसरात मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळी पाचनंतर वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. महात्मा गांधी रस्त्यावरील १५ ऑगस्ट चौक ते अरोरा टॉवर्स चौकदरम्यान वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे.

» गोखले रस्त्यावरील (फर्ग्युसन रस्त्यावरील) गोखले स्मारक चौक ते फर्ग्युसन महाविद्यालय प्रवेशद्वारापर्यंत वाहनांना प्रवेश बंद करण्यात येणार आहे. पहाटे पाचपर्यंत वाहनांना बंदी राहणार आहे.

» कोथरूड आणि कर्वे रस्त्याकडून येणारी वाहतूक खंडुजीबाबा चौक येथे थांबविण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक विधी महाविद्यालय रस्ता, प्रभात रस्ता, अलका चित्रपटगृहाकडे वळविण्यात येणार आहे.

» जंगली महाराज रस्त्यावर होणारी गर्दी विचारात घेऊन झाशीची राणी चौकातून वाहतूक बंद करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक गोखले स्मारक चौक, उपरस्ते, पुणे महापालिका भवन, ओंकारेश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज रस्तामार्गे वळविण्यात येणार आहे.

---

# नववर्षात विमानतळाला गती

## मुख्यंत्र्यांनी घेतला पुरंदरमधील कामांचा सविस्तर आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुरंदर तालुक्यात प्रस्तावित असलेल्या विमानतळाच्या कामांचा कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला. आता आगामी वर्षात पुरंदर येथील विमानतळाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी पदभार स्विकारल्यानंतर 20 दिवसांतच पुरंदर विमानतळाचा आढावा घेऊन सद्यस्थिती जाणून घेतली. यापार्श्वभूमीवर पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनाचे मॉडेल निश्चित करण्यासह इतर प्रश्न सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

राज्यात पायाभूत सुविधांच्या निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर रस्ते, जल, हवाई मार्गांचे बळकटीकरण करण्यात येत आहे. राज्याचा प्रत्येक भाग विमानाने जोडण्यासह अस्तित्वातील विमानतळांचे विस्तारीकरण करण्याच्या कामाला गती देण्यात यावी. या कामांना केंद्र शासनाबरोबरच राज्य शासनाकडून भरीव स्वरुपाचे सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत स्पष्ट केले आहे.

विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेपूर्वी पुरंदर विमानतळासंदर्भात एक बैठक झाली. या बैठकीमध्ये पुरंदर विमानतळास मान्यता देताना पुन्हा लोहगाव विमानतळ नागरी वाहतुकीसाठी बंद करण्याच्या अटीचा पुर्नउच्चार लष्कराकडून करण्यात आला आहे. यापूर्वी परवानगी देताना ही अट होती. मात्र, तेव्हा ती वगळण्यात आली. आता, पुन्हा लष्कराकडून त्यासाठी आग्रह धरला जात आहे. त्यास राज्य सरकारने विरोध करीत ही अट वगळावी, अशी विनंती केली आहे. त्यावर अद्याप कोणतीही निर्णय झालेला नाही, त्यामुळे सर्व प्रक्रिया पूर्ण होऊनही नियोजित विमानतळाचे काम सुरू होऊ शकलेले नाही.

# अंगणवाडी सेविका मानधनासाठी निधी

## राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने मान्यता दिली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविका व मदतनीसांच्या मानधन व प्रोत्साहन भत्त्यासाठी निधी अर्थसंकल्पित केलेला १६३ कोटी ४३ लाख रुपयांचा निधी वितरीत करण्यास राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने मान्यता दिली आहे.



एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्त यांच्या अधिनस्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येते.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त होत नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांचे मानधन नियमित अदा करणे शक्य व्हावे, याकरिता वित्तचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत अंगणवाडी सेविकांच्या मानधनाची अर्थसंकल्पित केलेली रक्कम अपेक्षित केंद्रीय सहाय्य अप्राप्त असले तरी खर्च करण्यास विभागास अनुमती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यामुळे अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे डिसेंबर २०२४ या महिन्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करण्याकरिताचा मार्ग मोकळा झाला आहे.

या बैठकीत अंगणवाडी सेविकांच्या मानधनाची रक्कम केंद्रीय साहाय्य यांच्याकडून प्राप्त होत असली तरी खर्च करण्यास विभागास अनुमती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयान्वये अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस यांचे डिसेंबर २०२४ या महिन्याचे मानधन व प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी एकूण १६३.४३ कोटी एवढा निधी वितरित व खर्च करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. त्यानुसार लवकरच अंगणवाडी सेविकांचे थकीत मानधन मिळणे शक्य होणार आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेची मोठी कारवाई!

## करसंकलन विभागाकडून दोन दिवसात तब्बल 128 मालमत्ता जप्त

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाकडून तीन लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या बिगरनिवासी, औद्योगिक, मिश्र मालमत्ता प्राध्यान्याने जप्त करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार, विभागाने शनिवार, दिनांक, 28 डिसेंबर व रविवार, दिनांक, 29 डिसेंबर यादिवशी सुद्धा जप्तीची धडक मोहिम राबविली. यामध्ये शनिवारी 65 मालमत्ता जप्त करण्यात आल्या असून रविवारी 63 मालमत्तावर जप्तीची कारवाई करण्यात आली.

करसंकलन विभागाची जप्तीच्या धडक मोहीम लक्षात घेऊन आणि आपली मालमत्ता जप्त होऊ नये म्हणून शनिवारी 139 मालमत्ता धारकांनी 2 कोटी 91 लाख 13 हजार 770 तसेच रविवारी 89 मालमत्ताधारकांनी 1 कोटी 80 लाख 24 हजार 13 इतका एकूण



तब्बल 4 कोटी 71 लाख 37 हजार 783 रुपयांच्या रकमेचा मालमत्ता कराचा भरणा केला. सदरची मोहिम सात जानेवारीपर्यंत सलग राबविण्याय येणार असून 1 लाखाहून अधिक थकबाकी असणारी एकही बिगरनिवासी ,औदयोगिक आणि मिश्र मालमत्ता जप्ती कारवाईमधून वगळली जाणार नाही.

नागरिकांनी कर भरण्यासाठी महापालिकेकडून विविध माध्यमातून वेळोवेळी आवाहन करण्यात आले. अद्यापही ज्या नागरिकांनी कर भरला नाही अशा नागरिकांना आपली मालमत्ता लाखबंदीस पात्र असल्याची जप्ती पूर्व नोटीस सुद्धा पाठविण्यात आली. अद्याप ज्या मालमत्ता धारकांनी कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तावर मालमत्ता लाखबंदची कारवाईची मोहिम सुरू करण्यात आली आहे. ही मोहिम सात जानेवारीपर्यंत चालू राहणार आहे. एक लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या शंभर टक्के बिगरनिवासी, ओद्योगिक, मिश्र मालमत्तावर प्राधान्याने मालमत्ता लाखबंदची कारवाई करण्यात येणार आहे. यामधून एकही मालमत्ता वगळण्यात येणार नाही. त्यामुळे थकबाकीदारांनी आपल्या कराचा ऑनलाईन स्वरूपात भरणा करून मालमत्ता लाखबंदची कारवाई टाळावी. कार्यवाहीच्या वेळेस पुढील दिनांकाचे धनादेश कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, असे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे- पाटील यांनी सांगितले.

> शहरातील जागरूक नागरिकांनी कायम जागरूकपणे कराचा भरणा करून शहराच्या विकासात मोलाचा वाटा उचलला आहे. महानगरपालिकेने नागरिकांना मालमत्ता करामध्ये विविध सवलती दिल्या असून नागरिकांनी त्याचा लाभ सुद्धा घेतला आहे. आता थकबाकी असणाऱ्या मालमत्ताधारकांनी आपल्या कराचा भरणा करून मालमत्ता जप्तीची कटू कारवाई टाळावी.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

> शनिवार व रविवार यादिवशी राबविण्यात आलेल्या जप्ती मोहिम यापुढे तीव्र मोहीम स्वरूपात सतत 7 जानेवारीपर्यंत चालूच राहणार असून 1 लाखाहून अधिक थकबाकी असणाऱ्या 100 % बिगरनिवासी, ओद्योगिक, मिश्र मालमत्तावर प्राधान्याने मालमत्ता जप्तीची कारवाई करणेत येणार असून यामधून एकही मालमत्ता वगळण्यात येणार नाही. करसंकलन विभागाकडून अन्य कामास प्राधान्य न देता थकबाकीदारांकडून रक्कम वसुलीस / जप्ती मोहिमेस सर्वाधिक प्राधान्य देणार आहे. त्यामुळे थकबाकीदारांनी आपल्या कराचा ऑनलाईन स्वरूपात भरणा तात्काळ करून मालमत्ता जप्तीची कारवाई टाळावी.तसेच जप्त कार्यवाहीचे वेळेस पुढील दिनांकाचे धनादेश कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.
>
> **- अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# सौर पथदिव्यांनी उजळणार वडगावचे रस्ते

## सुमारे 2 कोटी 25 लाख रुपयांचा निधी उपलब्ध : 300 पथदिवे बसविण्याच्या कामास सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

वडगाव नगरपंचायत हद्दीत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत उपलब्ध २ कोटी २५ लक्ष निधीतून सौर ऊर्जेवर चालणारे स्ट्रीट लाईट्चे एकूण ३०० पथदिवे बसविण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती मुख्याधिकारी डॉ. प्रविण निकम यांनी दिली. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या माध्यमातून व माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे यांच्या सततच्या पाठपुराव्यातून हा निधी उपलब्ध झाला आहे.



वडगाव नगरपंचायत हद्दीतील केशवनगर येथील खापरे ओढा ते रेल्वे गेट, कातवी येथील मुख्य रस्ता तसेच खंडोबा मंदिर ते विशाल लॉन्स या तीनही रस्त्यावर सौर पथदिवे बसविणे व नगरपंचायत प्रशासकीय इमारत सोलर ऑफ ग्रीड सिस्टीम बसविण्यासाठी दिनांक १७ मार्च व २२ मे २०२३ रोजी या कामांचे अंदाजपत्रक तयार करून सर्व विषयांना सभेत मान्यता देण्यात आली होती. मागील महिन्यात तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रक्रिया पूर्ण होऊन प्रत्यक्ष निधी मंजूर झाला.

त्यानंतर आज रोजी प्रथमतः शहरामधील खापरे ओढा परिसरातून सौर पथदिवे बसविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. येत्या जानेवारी अखेरपर्यंत मुख्य रस्त्यांवरील पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण होईल,अशी माहिती माजी नगराध्यक्ष मयूर ढोरे व मुख्याधिकारी प्रविण निकम यांनी दिली.

सतत महावितरणकडून वीज दरात वाढ होत असते. त्यामुळे पथदिव्यांच्या वीज वापराचा खर्च वाढतच जात आहे. त्यामुळे येत्या कालावधीत जर सर्वच भागातील पथदिवे सौरऊर्जेवर कार्यान्वित केल्यास वीज बिलात बचत होईल आणि त्याचा नगरपंचायतीला आर्थिक फायदा होईल.

### अपारंपारिक उर्जेचा वापर करणे गरजेचे

**» राज्यातील विजेची मागणी व पुरवठा यामधील तफावत पाहता अपारंपारिक उर्जेचा वापर करणे योग्य होणार आहे. राज्यातील ग्रामीण भागात सध्याचा विजेचा पुरवठा लक्षात घेता, ग्रामीण भागात पर्यावरण संतुलन प्रणित मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अपारंपारिक स्त्रोतातून निर्मित विजेचा पुरवठा व्हावा या उद्देशाने ग्रामीण भागातील रस्त्यांवर सौर पथ दिवे खांब उभारण्याची योजना सन २०१०-२०११ पासून महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण विभागाने कार्यान्वित केली आहे. ही योजना राज्य शासन, केंद्र शासन, नगरपंचायत व इतर ग्रामपंचायतीच्या सहभागातून राबविण्यात येत आहे.**

# आरटीई प्रवेशासाठी शाळानोंदणी कासवगतीने

## केवळ अडीच हजारांवर शाळांची नोंदणी : आज शाळानोंदणीचा अंतिम दिवस

**पुणे | प्रतिनिधी**

इयत्ता पहिली ते आठवीसाठी इंग्रजी शाळांमध्ये मोफत शिक्षणाची कवाडे उघडणाऱ्या आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी 18 डिसेंबरला शाळानोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आणि नोंदणीसाठी 31 डिसेंबरची मुदत देण्यात आली आहे. परंतु, नोंदणीसाठी शेवटचे दोन दिवस शिल्लक असतानाही केवळ अडीच हजारांवर शाळांची नोंदणी झाली आहे. त्यामुळे आरटीई प्रवेशासाठी शाळांसह प्रशासन देखील सुस्त असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.




शिक्षण हक्क कायद्यांतर्गत विशेष करून इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये 25 टक्के आरक्षित जागांसाठी आरक्षित प्रवर्ग तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आरटीई प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविली जाते. संबंधित प्रवेश प्रक्रिया दरवर्षी उशिरा सुरू होते. त्यातच ऑनलाइन यंत्रणेतील दोष, शासनाकडून मान्यता देण्यास होणारी दिरंगाई, अशा विविध कारणांमुळे आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडते.

त्यामुळे एकीकडे डिसेंबर महिन्यात सीबीएसई शाळांमध्ये प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असली, तरी आरटीई प्रवेश प्रक्रियेला मात्र मुहूर्त लागत नव्हता. अखेर यंदा संबंधित प्रवेश प्रक्रिया डिसेंबर महिन्यातच सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परंतु, संबंधित निर्णयाला इंग्रजी शाळांचे अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

सन 2025-26 या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई 25 टक्के प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याच्या अनुषंगाने 18 ते 31 डिसेंबरदरम्यान शाळानोंदणी आणि शाळा व्हेरिफिकेशनची लिंक सुरू करण्यात आली आहे. शाळा नोंदणीनंतरचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा शाळा व्हेरिफिकेशन असतो. त्यानुसार शाळा व्हेरिफिकेशन करताना बंद करण्यात आलेल्या शाळा, अल्पसंख्याक दर्जाप्राप्त शाळा, अनधिकृत शाळा तसेच स्थलांतरित झालेल्या शाळा व्हेरिफिकेशन करताना योग्य ती खबरदारी घेण्यात यावी, याबाबत सर्वस्वी जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

शाळा मान्यता ज्या मंडळाची आहे, तेच मंडळ शाळेने नोंदणी करताना निवडले आहे का, याची खात्री करण्यात यावी. (उदा. शाळा मान्यता राज्य मंडळाची आहे व शाळेने नोंदणी करताना केंद्रीय मंडळ निवडले आहे.) तरी संबंधित सूचनांचे पालन करून दिलेल्या कालावधीमध्ये शाळानोंदणी व शाळा व्हेरिफिकेशनची कार्यवाही पूर्ण करणे गरजेचे आहे. परंतु, याकडे प्राथमिकच्या शिक्षणाधिकाऱ्यांचे प्रचंड दुर्लक्ष होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### शाळानोंदणीला मुदतवाढ द्यावी लागणार...

» राज्यात 18 डिसेंबरपासून शाळानोंदणीला सुरुवात झाली, तर 31 डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मुदत पूर्ण होण्यास दोन दिवस शिल्लक आहेत. परंतु, 9 हजारांहून अधिक शाळांची नोंदणी होणे अपेक्षित असताना केवळ 2 हजार 616 शाळांची नोंदणी झाली आहे. तर, नोंदणी झालेल्या शाळांमध्ये 36 हजार 455 जागा उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे शाळानोंदणीला आता मुदतवाढ द्यावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर महाग

## किरकोळ बाजारात आंबेमोहोर तांदळाच्या दरात प्रतिकिलोमागे 10 ते 15 रुपयांनी वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

सुवासिक आंबेमोहोर तांदळाचा हंगाम सुरू झाला आहे. यंदा हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर तांदळाच्या दरात १५ ते २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात केंद्र शासनाने बिगर बासमती तांदळावरील निर्यात बंदी मागे घेतली, तसेच २० टक्के निर्यात कर कमी केला. परदेशातून आंबेमोहोर तांदळाला मागणी वाढल्याने हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोर महाग झाल्याची माहिती तांदूळ व्यापाऱ्यांनी दिली.



घाऊक बाजारात प्रतिक्विंटल आंबेमोहोर तांदळाचे आठ ते नऊ हजार रुपये दर मिळाले आहेत. गेल्या वर्षी हंगामाच्या सुरुवातीला सात ते साडेसात हजार रुपये दर मिळाले होते. आंबेमोहोरची सर्वाधिक लागवड मध्य प्रदेशात केली जाते. आंबेमोहोरची ८० टक्के लागवड मध्य प्रदेशात केली जाते. आंध्र प्रदेशात आंबेमोहोरची लागवड केली जाते. यंदा मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेशात लागवड कमी झाली आहे. बिगर बासमती तांदळावरील निर्यात बंदी मागे घेतल्याने व्यापाऱ्यांनी जागेवरच आंबेमोहोरची मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. त्यामुळे यंदा हंगामाच्या सुरुवातीला आंबेमोहोरच्या दरात मोठी वाढ झाली आहे, अशी माहिती मार्केट यार्डातील जयराज आणि कंपनीचे संचालक तांदूळ व्यापारी धवल शहा यांनी दिली. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नवीन आंबेमोहोर तांदळाची आवक होण्यास सुरवात होते. आंबेमोहोर तांदळाच्या दरात १० ते १५ रुपयांनी वाढ झाली आहे. वर्षभर वापरल्या जाणाऱ्या बासमती, आंबेमोहोर, इंद्रायणी, सुरती कोलम या तांदळापैकीआंबेमोहोरला चांगली मागणी आहे.

### महाराष्ट्रात आंबेमोहोरच्या लागवडीत घट

» आंबेमोहोर तांदळाचे सर्वाधिक उत्पादन मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांमध्ये होते. पुणे जिल्ह्यातील कामशेत, भोर या भागात काही प्रमाणात त्याचे उत्पादन घेतले जाते. काही वर्षांपूर्वी आंबेमोहोरचे सर्वाधिक उत्पादन महाराष्ट्रात घेतले जात होते. तांदूळ लागवड करणाऱ्या पुणे, मावळ, भोर, कामशेत या भागात झपाट्याने शहरीकरण वाढले. जमिनींना चांगला भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी जमिनी विकल्या. आंबेमोहोरची लागवड वर्षातून एकदाच घेतली जाते. लागवडीस वेळ लागत असल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांनी लागवडीकडे पाठ फिरवली. आंबेमोहोर तांदळाची लागवड महाराष्ट्रातून कमी होत चालली आहे.

### आंबेमोहोरला उच्चांकी दर ?

» सुगंधी आंबेमोहोर तांदळाचा राजा म्हणून ओळखला जातो. हा तांदूळ महाराष्ट्रात बारा महिने वापरला जातो. विशेषतः पुणे, मुंबई, ठाणे या शहरातून आंबेमोहोर तांदळाला खूप मोठी मागणी आहे. यावर्षी बासमती तांदळाच्या दरांपर्यंत आंबेमोहोर तांदळाचे दर पोहोचतील अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. तसे झाल्यास हा एक विक्रम होईल. त्याचबरोबर आंबेमोहोर तांदळाचे दर यावर्षी कमी होण्याची शक्यता खूप कमी आहे, असे तांदूळ व्यापारी धवल शहा यांनी नमूद केले.